# लिपिक – टंकलेखक

**वेळ : 2 तास** **एकूण प्रश्न : 200** **एकूण गुण : 200**

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाच्या विशेषणाचा प्रकार ओळखा. प्रश्न क्रमांक 1 ते 4.

1. माझ्या भावाचे कापड दुकान आहे.
   (A) धातूसाधित विशेषण (B) नामसाधित विशेषण (C) सार्वनामिक विशेषण (D) गुण विशेषण

2. पिकलेली बोरे गोड असतात.
   (A) सर्वनामसाधित विशेषण (B) धातूसाधित विशेषण (C) अव्ययसाधित विशेषण (D) विधिविशेषण

3. सुषमा चांगली धावते.
   (A) क्रियाविशेषण (B) अव्ययसाधित विशेषण
   (C) गणनावाचक विशेषण (D) क्रमवाचक विशेषण

4. शहाणा मुलगा शांत असतो.
   (A) नामसाधित विशेषण (B) अव्ययसाधित विशेषण
   (C) सार्वनामिक विशेषण (D) गुण विशेषण

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाच्या क्रियापदाचा प्रकार ओळखा. प्रश्न क्रमांक 5 ते 7.

5. अंजलीने रामायण वाचले.
   (A) सकर्मक क्रियापद (B) अकर्मक क्रियापद
   (C) उभवयविध क्रियापद (D) यापैकी नाही

6. तुम्हांला एवढे जलद गतीने चालवते तरी कसे ?
   (A) संयुक्त क्रियापद (B) प्रयोजक क्रियापद (C) शक्य क्रियापद (D) अशक्य क्रियापद

7. भीमाने औत चोरले.
   (A) सकर्मक क्रियापद (B) प्रयोजक क्रियापद (C) सहाय्यक क्रियापद (D) अकर्मक क्रियापद

8. खालीलपैकी कोणता शब्द क्रियापद नाही ?
   (A) पेरणे (B) उपरणे (C) वेचणे (D) उपणने

9. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
   सभोवार गर्द हिरवी झाडी पसरली होती.
   (A) स्थलवाचक (B) रितीवाचक (C) कालवाचक (D) परिणामवाचक

10. वाक्यातील क्रियाविशेषण ओळखा.
    बाण खालून वर गेला.
    (A) खालून (B) वर (C) बाण (D) गेला

SPACE FOR ROUGH WORK

11. 'वारंवार' या शब्दाचा प्रकार कोणता ?
(A) नाम (B) क्रियाविशेषण अव्यय (C) शब्दअव्यय (D) विशेषण

12. सदा सर्वदा योग तुझा घडावा. अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचे क्रियाविशेषण आहे ?
(A) रीतिवाचक (B) कालदर्शक (C) कालवाचक क्रियापद (D) स्थलवाचक

13. 'पक्षी झाडावर बसतो' या वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
(A) पक्षी (B) झाड (C) वर (D) बसतो

14. 'डोंगरमाथ्यामागे सोनेरी किरणे पसरली होती'. या वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
(A) मागे (B) माथा (C) किरणे (D) पसरली

15. 'देशासाठी विरांनी त्याग केला' या वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा.
(A) साठी (B) देश (C) विरांनी (D) त्याग

16. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा.
मनुष्याने लोभ धरु नये.
(A) द्वितीया (B) तृतीया (C) चतुर्थी (D) पंचमी

17. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा.
बाबांनी विमानाने प्रवास केला.
(A) करण (B) अधिकरण (C) संप्रदान (D) अपादान

18. प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे ते ओळखा.
बाबांनी विमानात प्रवेश केला.
(A) करण (B) अधिकरण (C) संप्रदान (D) अपादान

19. 'सर्व जनतेला आव्हान करण्यात आले होते' या वाक्याचा काळ ओळखा.
(A) पूर्ण भूतकाळ (B) अपूर्ण वर्तमानकाळ (C) अपूर्ण भूतकाळ (D) रिती भूतकाळ

20. 'आम्ही हसलो' काळ ओळखा.
(A) वर्तमानकाळ (B) भविष्यकाळ (C) भूतकाळ (D) अपूर्ण भूतकाळ

21. 'रमा गीत गाते' काळ ओळखा.
(A) भविष्यकाळ (B) वर्तमानकाळ (C) रिती वर्तमानकाळ (D) भूतकाळ

22. 'त्याने जेवण बनविले' या वाक्याचा अपूर्ण वर्तमानकाळ करा.
(A) तो जेवण बनवित असतो (B) तो जेवण बनवित असे
(C) तो जेवण बनवित होता (D) तो जेवण बनवित आहे

23. 'बाळ दररोज शाळेत जातो' या वाक्याचा अपूर्ण भूतकाळ करा.
(A) बाळ दररोज शाळेत जात असेल (B) बाळ दररोज शाळेत गेला
(C) बाळ दररोज शाळेत जातो (D) बाळ दररोज शाळेत जात होता

SPACE FOR ROUGH WORK

24. सगळेच नंबर एक कसे बनतील. काळ ओळखा.
(A) वर्तमानकाळ (B) भूतकाळ (C) भविष्यकाळ (D) चालू वर्तमानकाळ

25. 'सुहासने गोष्टीचे पुस्तक वाचले'. प्रयोग ओळखा.
(A) सकर्मक कर्तरी (B) कर्तरी (C) कर्मणी (D) अकर्मक कर्तरी

26. 'मुलांनी चांगले वागावे'. प्रयोग ओळखा.
(A) सकर्मक भावे (B) कर्मणी (C) अकर्मक भावे (D) सकर्मक कर्तरी

27. 'मधू पुस्तक वाचतो.' प्रयोग ओळखा.
(A) कर्तरी (B) भावे (C) कर्मणी (D) संकीर्ण

28. 'प्रत्येक कुत्रा स्वभावाने प्रामाणिक असतो.' प्रयोग ओळखा.
(A) कर्तृ कर्मणी (B) सकर्मक भावे
(C) अकर्मक कर्तरी (D) सकर्मक कर्तरी

29. 'प्रतिक्षण' या सामासिक शब्दाचा समास ओळखा.
(A) नत्र बहुव्रिही (B) अव्ययीभाव (C) द्विगू (D) द्वंद्व

30. खालीलपैकी समाहारद्वंद्व समासाचे उदाहरण कोणते ?
(A) पंचानन (B) भाजीपाला (C) पतिपत्नी (D) त्रिभुवन

31. 'क्षणोक्षणी' या सामासिक शब्दाचा विग्रह निवडा.
(A) क्षणभर (B) क्षणिक (C) क्षण + क्षण (D) प्रत्येक क्षणाला

32. 'हरेश्वर' या शब्दाचा विग्रह करा.
(A) हरे + इश्वर (B) हर + ईश्वर (C) हरी + श्वर (D) हर + ईश्वर

33. पुन: + जन्म संधी करा.
(A) पुन्हाजन्म (B) पुनर्जन्म (C) पुर्नजन्म (D) पुर्णजन्म

34. 'मुनीच्छा' या शब्दाचा विग्रह ओळखा.
(A) मुनी + इच्छा (B) मन + ईच्छा
(C) मुनी + च्छा (D) मुनि + इच्छा

खालील वाक्य संबंधातील अलंकार ओळखा. प्रश्न क्र. 35 व 36.

35. श्रीकृष्ण नवरा मी नवरी।

शिशुपाल नवरा मी नवरी।
(A) श्लेष (B) अपन्हुती (C) अतिशयोक्ती (D) रूपक

36. शकुंतलेसारखी सौंदर्यवती तीच। अलंकार ओळखा.
(A) अतिशयोक्ती (B) रूपक (C) अनन्वय (D) दृष्टांत

SPACE FOR ROUGH WORK

37. खालीलपैकी कोणते नाम नेहमी अनेकवचनी आढळते ?
(A) डोहाळे (B) कांजिण्या (C) शहारे (D) वरील सर्व

38. नामाच्या तिन्ही प्रकारांपैकी __________ नामाचे अनेकवचन होते.
(A) विशेषनाम (B) भाववाचकनाम (C) सामान्यनाम (D) वरील सर्व

39. सलगी दाखवितांना नेहमी कोणते वचन वापरतात ?
(A) द्विवचन (B) बहुवचन (C) अनेकवचन (D) एकवचन

40. 'नर्तक' स्त्रीलिंगी ओळखा.
(A) नर्तकी (B) नृत्य (C) नर्तिका (D) नर्तीक

41. 'देह' या शब्दाचे स्त्रीलिंगी काय ?
(A) देह (B) काया (C) शरीर (D) धड

42. ज्याला आकार नाही या अर्थाचा शब्द.
(A) निराकार (B) आकारी (C) अआकार (D) शून्याकार

43. सत्य प्रस्थापित होण्यासाठी आग्रह धरणारा
(A) सत्यमेव (B) सत्यावान (C) सत्यवादी (D) सत्याग्रही

44. ज्याने आपले नाव गुप्त ठेवले आहे या अर्थी येणारा शब्द.
(A) अनाविक (B) अनाम (C) अनामिक (D) नाव नसलेला

45. 'मितव्ययी' म्हणजे
(A) कमी बोलणारा (B) कमी खाणारा
(C) न रागवणारा (D) काटकसरीने राहणारा

46. 'केलेले उपकार जो जाणत नाही असा' योग्य शब्द निवडा.
(A) कृतज्ञ (B) कृतघ्न (C) निरिच्छ (D) कर्मयोगी

47. घरादाराला व देशाला पारखा झालेला
(A) देशद्रोही (B) फितुर (C) परावलंबी (D) निर्वासित

48. 'शेतकऱ्यांना मिळणारे कर्ज' या शब्दसमुहाकरिता योग्य शब्द निवडा.
(A) तगाई (B) तारण (C) अनुदान (D) विमा

49. 'धूळ खात पडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?
(A) वापर होणे (B) वापर न होणे
(C) इलाज नसणे (D) धुळीने माखणे

50. 'गाल रंगविणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?
(A) गाल रंगाने रंगविणे (B) श्रीमुखात मारणे
(C) रंगकाम करणे (D) चेहरा लाल करणे

SPACE FOR ROUGH WORK

Make the sentence using Present Indefinite tense with suitable forms of verb given in the bracket.

51. Buses ........... on this road every hour. (run)
    (A) Buses run on this road every hour
    (B) Buses runs on this road every hour
    (C) Buses running on this road every hour
    (D) None of the above

Make the sentence using Present Indefinite tense with suitable forms of verb given in the bracket.

52. Apples ........... ripe in autumn. (get)
    (A) Apples get ripe in autumn
    (B) Apples got ripe in autumn
    (C) Apples getting ripe in autumn
    (D) None of the above

Make the sentence using Present Continuous tense with suitable forms of verb given in the bracket.

53. She ........... for America next year. (leave)
    (A) She leaves for America next year
    (B) She will leave for America next year
    (C) She left for America next year
    (D) She is leaving for America next year

Make the sentence using Future Perfect tense with suitable forms of verb given in the bracket.

54. I ........... this essay by tomorrow morning. (complete)
    (A) I complete this essay by tomorrow morning
    (B) I will complete this essay by tomorrow morning
    (C) I will have completed this essay by tomorrow morning
    (D) None of the above

Make the sentence using Future Continuous tense with suitable forms of verb given in the bracket.

55. Richa ........... food when her friend arrives. (cook)
    (A) Richa will cook food when her friend arrives
    (B) Richa will cooking food when her friend arrives
    (C) Richa will be cooking food when her friend arrives
    (D) None of the above

Use the suitable form of Infinitive/Gerund in the following sentence.

56. I feel pleasure ........... you of my success.
    (A) to inform
    (B) to informing
    (C) in informing
    (D) none of the above

Use the suitable form of Infinite/Gerund in the following sentence.

57. She has given up ........... on her friend's advice.
    (A) smoke (B) smoking (C) to have smoked (D) to smoking

Choose the most suitable alternative to make the sentence logical in sense.

58. She has ........... in the bed for two hours.
    (A) laid (B) lain (C) lay (D) none of the above

Choose the most suitable alternative to make the sentence logical in sense.

59. The executioner ........... him till he died.
    (A) hanged (B) hung (C) hang (D) none of the above

Choose the most suitable alternative to make the sentence logical in sense.

60. As soon as we arrived in the dormitory we ........... our pullovers.
    (A) hang (B) hanged (C) hung (D) none of the above

SPACE FOR ROUGH WORK

Fill in the blanks with suitable prepositions from the alternatives given under each sentence. (Q. No. **61** to **70**)

61. He made insulting remarks that are derogatory ________ his reputation.
(A) for (B) to (C) in (D) into

62. The Court has absolved him ________ all the charges leveled against him.
(A) of (B) from (C) to (D) within

63. Now-a-days there is rage ________ pop music among the Indian youth.
(A) for (B) with (C) of (D) to

64. She blushed ________ the mention of her lovers name.
(A) on (B) at (C) for (D) with

65. He decided to enter ________ a new course of life.
(A) into (B) upon (C) in (D) for

66. As a step of renovation he has decided to replace old furniture ________ new one.
(A) with (B) by (C) for (D) to

67. There is no limit ________ the wants of man.
(A) for (B) to (C) of (D) with

68. Don't mix with those who don't approve ________ your style of living.
(A) with (B) by (C) of (D) to

69. Everyone was greatly amused ________ her ignorance of simple facts of life.
(A) with (B) by (C) at (D) of

70. We have the habit of exulting ________ the discomfiture of our rivals.
(A) at (B) over (C) by (D) none of these

Choose the correct meaning of the underlined Idioms in the sentences from options given below : (Q. No. **71** to **75**)

71. The boy turned a deaf ear to the pleadings of all his well wishers.
(A) listened carefully (B) was deadly opposed
(C) posed indifference (D) not sympathise with

72. At the party, he is always in high spirits.
(A) talkative (B) cheerful (C) drunk (D) uncontrollable

73. The popularity of yester year's superstar is on the wane.
(A) growing more (B) at its peak (C) growing less (D) at rock bottom

74. The present under graduate syllabus leaves very little elbow room for teachers to be innovative.
(A) room for elbow (B) space (C) freedom (D) ground

75. If you rub him the wrong way, he is bound to react.
(A) annoy him (B) abuse him (C) flatter him (D) encourage him

In the following questions you will find sentences, part of which are underlined. Compare the underlined part with options given which is an improvement upon underlined part. (Q. No. **76** to **80**)

76. When it was dark they decided to put at an inn.
(A) put off with (B) put up at (C) put out in (D) no improvement

**SPACE FOR ROUGH WORK**

77. You should avoid to make such trivial mistakes.
   (A) avoid making
   (B) avoid to have made
   (C) avoid make
   (D) no improvement

78. The passengers are waiting for the bus out side the bus stand at the main gate for long.
   (A) were waited
   (B) were waiting
   (C) have been waiting
   (D) no improvement

79. If the room had been brighter, I would have been able to read for a while before bed time.
   (A) if the room was brighter
   (B) if the rooms are brighter
   (C) had the room brighter
   (D) no improvement

80. With a thundering roar the huge rocket soared up from the launching pad.
   (A) flew up
   (B) went upwards
   (C) took on
   (D) no improvement

In the following sentences a word or phrase is underlined. Choose the word nearest in the meaning to underlined part. (Q. No. **81** to **83**)

81. The inspector was a vigilant young man.
   (A) smart (B) watchful (C) ambitious (D) intelligent

82. Incensed by his rude behaviour the manager suspended the work.
   (A) enthused (B) enraged (C) inflamed (D) excited

83. Being a sociable bird she was conspicuous by her absence in the club last evening.
   (A) important (B) prominent (C) ignorant (D) apparent

The following sentences consists of word or a phrase which is underlined select the word or phrase which is closest to the opposite in meaning of the underlined word or phrase. (Q. No. **84** to **86**)

84. The plane lay burnt in fragments.
   (A) whole (B) parts (C) scraps (D) pieces

85. The visit of the Vice Chancellor has been deferred indefinitely.
   (A) expedited (B) dissolved (C) postponed (D) put off

86. Though generous and benevolent, he did not meet with success in his career.
   (A) beneficent (B) malevolent (C) goodwill (D) liberal

Select the most suitable alternative to fill in the blank/blanks in the sentence to make it meaningful from among the given alternatives. (Q. No. **87** to **90**)

87. The salt spray has gradually ____________ the bridge.
   (A) spoilt (B) ravaged (C) demolished (D) eroded

88. There is several ways of ____________ the price at which a product can be marketd.
   (A) arriving (B) thinking (C) determining (D) noticing

89. I ____________ you to keep quit.
   (A) beg of (B) beg from (C) beg (D) beg for

90. The brilliant students will be ____________ scholarships.
   (A) honoured (B) awarded (C) rewarded (D) forwarded

**SPACE FOR ROUGH WORK**

In the following passage there are blanks with Question No. **91** to **100**. Choose suitable word for the blank.

Books give us all the information 91. ________ a man. They show 92. ________ interest. They are the 93. ________ to his mind. All the riches of the world 94. ________ their importance in the face of books. A man, with money and 95. ________ books is a poor man. Books have become so cheap that a library can 96. ________ be made. Money spent on good books is never 97. ________ It is a 98. ________ to read good books. Thus man gains both 99. ________ and wisdom. You can 100. ________ your library with the expenditure of only a few hundred rupees.

91. (A) about (B) for (C) through (D) from
92. (A) their (B) his (C) that (D) personal
93. (A) road (B) access (C) index (D) approach
94. (A) loose (B) lose (C) fade (D) vanish
95. (A) some (B) with (C) few (D) without
96. (A) easily (B) scarcely (C) hardly (D) frequently
97. (A) recovered (B) wasted (C) justified (D) withdrawn
98. (A) pleasure (B) blessing (C) addiction (D) obsession
99. (A) efficiency (B) knowledge (C) cunning (D) skill
100. (A) form (B) gather (C) begin (D) constitute

101. शिवाजी महाराजांचा 'राज्याभिषेक' कोणत्या गडावर झाला होता ?
(A) शिवनेरी (B) सिंहगड (C) रायगड (D) राजगड

102. 'चले जाव आंदोलनात' महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना कोणत्या ठिकाणी झाली होती ?
(A) पुणे (B) कोल्हापुर (C) सातारा (D) नागपुर

103. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकाचे ________ हे लेखक आहेत.
(A) इंदिरा गांधी (B) पंडित नेहरू (C) महात्मा गांधी (D) मौलाना आझाद

104. मुंबई विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली ?
(A) 1847 (B) 1857 (C) 1848 (D) 1858

105. महात्मा गांधींनी महाराष्ट्रात कोठे आश्रम स्थापन केला ?
(A) सेवाग्राम (B) पवनार (C) तपोवन (D) वर्धा

106. इंडिया हाऊसची स्थापना कोणी केली ?
(A) मदनलाल धिंग्रा (B) मादाम कामा (C) वि. दा. सावरकर (D) श्यामजी कृष्ण वर्मा

107. भारताच्या तिरंगी झेंड्याच्या मध्यभागी असलेल्या अशोकचक्रात एकूण किती आरे आहेत ?
(A) 11 (B) 21 (C) 14 (D) 24

108. महाराष्ट्रात मिठाचा सत्याग्रह कोठे झाला होता ?
(A) पुणे (B) वडाळा (C) नाशिक (D) रायगड

109. 'भारतीय राजकारणातील पितामह' असे कोणाला म्हणतात ?
(A) महात्मा गांधी (B) गोपाळ कृष्ण गोखले (C) दादाभाई नौरोजी (D) फिरोजशहा मेहता

**SPACE FOR ROUGH WORK**

110. महात्मा गांधींना राष्ट्रपिता ही पदवी कोणी दिली ?
(A) लोकमान्य टिळक (B) पंडित नेहरू (C) गो. कृ. गोखले (D) सुभाषचंद्र बोस

111. इ. स. 1911 मध्ये शाहू महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापुरात ______ ची पुन:स्थापना झाली.
(A) ब्राह्मो समाज (B) सत्यशोधक समाज (C) प्रार्थना समाज (D) परमहंस सभा

112. 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
(A) म. धोंडो केशव कर्वे (B) सरोजिनी नायडु (C) सावित्रीबाई फुले (D) ताराबाई शिंदे

113. दलित उद्धारासाठी धर्मांतराचा मार्ग कोणी स्विकारला ?
(A) दलित समाजाने (B) महर्षि कर्वे (C) डॉ. आंबेडकर (D) A व C दोन्ही

114. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मरणोत्तर प्रकाशित झालेला ग्रंथ कोणता ?
(A) बुद्ध अँड हिज धम्म् (B) थॉटस् ऑन पाकिस्तान (C) व्हू वेअर द शुद्राज (D) रिडल्स इन हिंदू-इझम

115. 'कमवा व शिका' ह्या योजनेचे जनक कोण ?
(A) महात्मा फुले (B) महर्षि कर्वे (C) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (D) कर्मवीर भाऊराव पाटील

116. जिल्हा नियोजन व विकास मंडळाचा अध्यक्ष कोण असतो ?
(A) जिल्हाधिकारी (B) जिल्हा नियोजन अधिकारी
(C) पालकमंत्री (D) वित्तमंत्री

117. नाबार्ड ही बँक कशाकरिता आहे ?
(A) कृषी (शेती) (B) आयात (C) निर्यात (D) कारखाने

118. भारतातील सर्वात मोठी राष्ट्रीयकृत बँक कोणती ?
(A) एस.बी.आय. (B) पंजाब नॅशनल बँक (C) बँक ऑफ इंडिया (D) आर.बी.आय.

119. भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षक/सरहिशेब तपासणीस यांची नेमणूक कोण करतात ?
(A) पंतप्रधान (B) राष्ट्रपती (C) संसद (D) अर्थमंत्री

120. भारत हा एक ______ देश आहे.
(A) अति मागासलेला (B) साम्यवादी (C) विकसनशील (D) विकसित

121. 'एकात्मिक ग्रामीण विकास योजना' कोणत्या साली सुरु झाली ?
(A) 2 ऑक्टोबर 1979 (B) 2 ऑक्टोबर 1980 (C) 15 ऑगस्ट 1981 (D) 15 ऑगस्ट 1982

122. भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर कोण आहेत ?
(A) रघुराम राजन (B) डी. सुब्बाराव (C) सी. रंगाराजन (D) वाय.आर. रेड्डी

123. देशातील लोकांचे राहणीमान खालीलपैकी कशावरुन ठरते ?
(A) राष्ट्रीय उत्पन्न (B) दरडोई उत्पन्न (C) बेकारी प्रमाण (D) गरीबीचे प्रमाण

124. चलनवाढ म्हणजे काय ?
(A) उपयोग्य वस्तुंच्या किंमत निर्देशांकातील वाढ (B) पैशाच्या किंमतीत वाढ
(C) परकीय चलनाच्या मूल्यात वाढ (D) अंदाजपत्रकीय तुटीतील वाढ भरुन काढण्यासाठी तुटीचा अर्थभरणा

SPACE FOR ROUGH WORK

125. खालीलपैकी कोणते खत 'रासायनिक खत' या प्रकारात येत नाही ?
(A) कंपोस्ट (B) युरिया (C) सुपर फॉस्फेट (D) अमोनियम सल्फेट

126. खालीलपैकी कोणता रोग 'डी' जीवनसत्वाच्या अभावी होतो ?
(A) स्कर्व्ही (B) रातआंधळेपणा (C) मुडदूस (D) बेरीबेरी

127. सल्फ्युरिक ॲसिड व जस्त यांच्या क्रियेने कोणता वायु तयार होतो ?
(A) हेलियम (B) हायड्रोजन (C) ऑक्सिजन (D) नायट्रोजन

128. निर्दोष डोळ्यात प्रतिमा कोठे तयार होते ?
(A) दृष्टीपटलापुढे (B) दृष्टीपटलामागे (C) पीत बिंदूवर (D) दृष्टीपटलावर

129. रेडिओ ॲक्टीव्हिटीचा शोध कोणी लावला ?
(A) हेन्री बेक्वेरेल (B) न्यूटन (C) नोबेल (D) मादामक्युरी

130. मलेरिया ———— मुळे होतो.
(A) सारकॉप्टीस स्केबी (B) मायकोबॅक्टेरियम लेप्री (C) स्वल्पविरामी जीवाणू (D) प्लाझमोडियम

131. कंपनसंख्या मापनाचे एकक कोणते ?
(A) मीटर (B) हर्ट्झ (C) ज्यूल (D) न्यूटन

132. पचनक्रियेत स्टार्चचे रूपांतर ———— पदार्थात होते.
(A) माल्टोज (B) नायट्रोजन (C) जीवनसत्व बी (D) ग्लुकोज

133. $E = mc^2$ हा सिद्धांत कोणी मांडला ?
(A) एडिसन (B) आईनस्टाईन (C) गॅलिलिओ (D) न्यूटन

134. समुद्राची खोली कशाच्या सहाय्याने मोजतात ?
(A) बॅरोमीटर (B) मॅनोमीटर (C) सिस्मोग्राफ (D) फॅदोमीटर

135. 'प्रकाशवर्ष' हे कशाचे परिमाण आहे ?
(A) वेळ (B) खगोलशास्त्रीय अंतर (C) वार्षिक गती (D) प्रकाश

136. कर्करोगावर उपचार करताना कोणत्या धातूचा उपयोग करतात ?
(A) निकेल (B) आयोडीन (C) कोबाल्ट (D) लोह

137. गोबर गॅसमधील प्रमुख घटक कोणता ?
(A) मिथेन (B) ब्युटेन (C) प्रोपेन (D) हिप्टेन

138. 'सुपरसॉनिक' म्हणजे काय ?
(A) प्रकाशापेक्षा कमी वेगवान (B) ध्वनीपेक्षा कमी वेगवान (C) ध्वनीपेक्षा अधिक वेगवान (D) प्रकाशापेक्षा अधिक वेगवान

139. जलद गतीने वाढणारे झाड कोणते ?
(A) पिंपळ (B) बाभूळ (C) निलगिरी (D) सागवान

140. मानवी शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी कोणती ?
(A) यकृत (B) हृदय (C) मोठे आतडे (D) जठर

SPACE FOR ROUGH WORK

141. चष्म्याच्या भिंगाची शक्ती कशामध्ये मोजतात ?
(A) वॅट (B) डेसीबल (C) डायॉप्टर (D) मीटर

142. तंबाखूमध्ये असणारा विषारी घटक कोणता ?
(A) कॅनिन (B) निकोटीन (C) टॅनिन (D) पर्याय A व B

143. रक्तातील 'कोलेस्ट्रॉल' पातळी कमी करणारी वनस्पती कोणती ?
(A) सदाफुली (B) सिंकोना (C) तुळस (D) आडुळसा

144. पाण्याचा गोठणबिंदु किती अंश सेल्सिअस आहे ?
(A) $0^\circ$ (B) $50^\circ$ (C) $4^\circ$ (D) $-4^\circ$

145. खालीलपैकी कोणत्या प्रकाशरंगाची तरललांबी अधिक असते ?
(A) लाल (B) निळा (C) हिरवा (D) पिवळा

146. शरीराचा तोल सांभाळण्याचे कार्य खालीलपैकी कोणाकडून केले जाते ?
(A) लहान मेंदू (B) चेतातंतू (C) चेतारज्जू (D) मोठा मेंदू

147. 'सैनिक पेशी' असे कोणत्या पेशींना म्हटले जाते ?
(A) तांबड्या पेशी (B) पांढऱ्या पेशी (C) रक्तबिंबीका (D) यापैकी नाही

148. चुन्याच्या ताज्या निवळीतून कोणता वायु जाऊ दिल्यास ती दुधी बनते ?
(A) अमोनिया (B) कार्बन डायऑक्साइड (C) सल्फरडाय ऑक्साइड (D) हायड्रोजन सल्फाइड

149. अन्नाचा मुख्य स्त्रोत ___________
(A) प्राणी (B) वनस्पती (C) सागरी पदार्थ (D) कीटक

150. 'क्ष' किरण म्हणजे ___________
(A) ऋण प्रभारित कण होय (B) धन प्रभारित कण होय
(C) प्रभारविरहित अणु कण होय (D) विद्युत चुंबकीय लहरी होय

151. $^2/_3$ या संख्येला कोणत्या संख्येने गुणावे म्हणजे $\frac{2}{3}$ चा गुणाकार व्यस्त मिळेल ?
(A) $\frac{4}{9}$ (B) $-1$ (C) $\frac{9}{4}$ (D) $^2/_3$

152. $\frac{A}{9} - \frac{23}{27} = \frac{85}{27}$ ; तर A = ?
(A) 36 (B) 62 (C) 54 (D) 45

153. 78 या त्रिकोणी संख्येचा पाया किती ?
(A) 13 (B) 12 (C) 6 (D) 26

SPACE FOR ROUGH WORK

**104**

154. पाया 21 असलेली त्रिकोणी संख्या कोणती ?
(A) 231 (B) 210 (C) 462 (D) 253

155. एका वर्तुळाच्या परिघावर समान अंतरावरील सहा बिंदु घेऊन प्रत्येकी दोन बिंदूंना जोडणारे जास्तीत जास्त किती रेषाखंड काढता येतील ?
(A) 21 (B) 12 (C) 15 (D) यापैकी नाही

156. व्यासपिठावर एकूण 12 पाहुणे होते. त्यापैकी प्रत्येकाने प्रत्येकाशी एकदा हस्तांदोलन केले, तर एकूण किती हस्तांदोलने होतील ?
(A) 24 (B) 66 (C) 78 (D) यापैकी नाही

157. $a^{\circ} = ?$
(A) 0 (B) a (C) 1 (D) – 1

158. $(-1)^7 \times (-1)^5 \times (-1)^4 \times (-1)^2 =$ किती ?
(A) 18 (B) – 1 (C) 1 (D) यापैकी नाही

159. $2^3 \times 2^0(4^0 - 3^0) = ?$
(A) $2^3$ (B) $2^2$ (C) $2^4$ (D) 0

160. $\dfrac{14a^3b^3c \times 2a^3b^3c^2}{21a^6b^4c^2} = ?$
(A) $\frac{4}{3}abc$ (B) $\frac{4}{3}bc$ (C) $\frac{4}{3}ab^2c$ (D) $\frac{4}{3}b^2c$

161. 164000 = ?
(A) $1.64 \times 10^5$ (B) $16.4 \times 10^3$ (C) $1.64 \times 10^6$ (D) $16.4 \times 10^5$

162. $64000 = (0.4)^3 \times 10^x$ तर x = ?
(A) 4 (B) 5 (C) 6 (D) 3

163. $9x^2 + \frac{1}{4x^2}$ ही राशी पूर्ण वर्ग होण्यासाठी खालीलपैकी कोणते पद मिळवावे ?
(A) $\pm 2x$ (B) $\pm 3$ (C) $\pm \frac{3}{2}x$ (D) $\pm \frac{3}{2}$

164. $(95)^2$ ची किंमत काढण्यासाठी कोणते सूत्र वापराल ?
(A) $(a + b)^2$ (B) $(a - b)^2$ (C) $a^2 - b^2$ (D) यापैकी नाही

165. 89 × 111 हा गुणाकार सोडविण्यास खालीलपैकी कोणते सूत्र वापराल ?
(A) $(a - b)^2$ (B) $(a + b)^2$ (C) $a^2 + b^2$ (D) $a^2 - b^2$

166. 709 × 25 + 75 × 709 = ?
(A) 709 (B) 7090 (C) 70900 (D) 1568

167. 999 × 385 = ?
(A) 306415 (B) 384615 (C) 384616 (D) 374615

SPACE FOR ROUGH WORK

168. $\frac{3.2 \times 3.2 \times 3.2 - 2.4 \times 2.4 \times 2.4}{3.2 \times 3.2 + 2.4 \times 3.2 + 2.4 \times 2.4} = ?$

(A) 3.2 (B) 0.8 (C) 2.4 (D) 5.6

169. 3, 33, 333,... या संख्यामालेतील पहिल्या 7 संख्या घेऊन त्याची बेरीज केली असता; त्या बेरजेतील संख्येत दशक स्थानचा अंक कोणता ?

(A) 1 (B) 0 (C) 7 (D) 5

170. $\frac{1}{1 \times 2} + \frac{1}{2 \times 3} + \frac{1}{3 \times 4} + \ldots + \frac{1}{17 \times 18} = ?$

(A) $\frac{35}{306}$ (B) $\frac{1 + 2 + 3 + \ldots + 18}{1 \times 2 \times 3 \times \ldots \times 18}$ (C) $\frac{17}{18}$ (D) यापैकी नाही

171. $\frac{1}{15 \times 35} + \frac{1}{35 \times 20} - \frac{1}{15 \times 20} = ?$

(A) 1 (B) $\frac{1}{15}$ (C) $\frac{1}{35}$ (D) 0

172. 2432 * × 2 * = 60812 * या प्रश्नात * च्या जागी कोणता अंक येईल ?

(A) 2 (B) 4 (C) 5 (D) 8

173. $2^{16}$ या संख्येच्या विस्तारीत रूपात एकक स्थानचा अंक कोणता ?

(A) 2 (B) 4 (C) 6 (D) 8

174. $2^{21}$ या संख्येच्या विस्तारीत रूपात एकक स्थानचा अंक कोणता ?

(A) 8 (B) 6 (C) 4 (D) 2

175. 4 ने नि:शेष भाग जाणारी संख्या कोणती ?

(A) 32462 (B) 45768 (C) 87542 (D) 75334

176. $\sqrt{\frac{1.21}{x}} = 10$; तर x = ?

(A) 12.1 (B) 0.121 (C) 121 (D) 0.0121

177. 8 × 0.08 × 0.008 = ?

(A) 0.512 (B) 0.00512 (C) 512 (D) 0.0512

178. 0.777 .... व्यावहारी अपूर्णांकात रूपांतर करा.

(A) $\frac{7}{10}$ (B) $\frac{7}{9}$ (C) $\frac{0.7}{1}$ (D) यापैकी नाही

179. एका संख्येतून 9 वजा करून 9 ने भागल्यास उत्तर 3 येते. तर त्या संख्येतून 8 वजा करून 4 ने भागल्यास उत्तर काय येईल ?

(A) 4 (B) 8 (C) 2 (D) 7

SPACE FOR ROUGH WORK

180. ताशी 40 किमी वेगाने जाणाऱ्या 400 मीटर लांबीच्या मालगाडीस 400 मीटर लांबीचा पूल ओलांडण्यास किती वेळ लागेल ?
(A) 1 मि. 12 सें. (B) 2 मि. 25 सें. (C) 36 सेकंद (D) 45 सेकंद

181. एक पाण्याची टाकी एका नळाने 8 तासात भरते तर दुसऱ्या नळाने 4 तासात रिकामी होते. दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले. तर भरलेली टाकी किती तासात रिकामी होईल ?
(A) 4 (B) 8 (C) 6 (D) 5

182. एका त्रिकोणाचे कोन अनुक्रमे $(x + 15^\circ)$, $(2x + 30^\circ)$ $(3x + 45^\circ)$ असल्यास तो त्रिकोण कोणत्या प्रकारचा आहे ?
(A) काटकोन त्रिकोण (B) लघुकोन त्रिकोण (C) विशालकोन त्रिकोण (D) समद्विभुज त्रिकोण

183. त्रिकोणाचा परिकेंद्र काढण्यास खालीलपैकी काय आवश्यक आहे ?
(A) मध्यगाचा संपात बिंदू (B) कोन दुभाजकाचा संपात बिंदू
(C) लंब दुभाजकाचा संपात बिंदू (D) शिरोलंबाचा संपात बिंदू


184. दोन वर्तुळाच्या त्रिज्यांचे गुणोत्तर 1 : 2 आहे तर त्यांच्या क्षेत्रफळाचे गुणोत्तर किती ?
(A) 2 : 1 (B) 1 : 2 (C) 4 : 1 (D) 1 4

185. एका वर्तुळाची त्रिज्या 5% ने वाढविल्यास क्षेत्रफळ किती टक्क्यांनी वाढेल ?
(A) 5% (B) 10.5% (C) 10.25% (D) 10%

186. एका सुसमबहुभूजा कृतीच्या आंतरकोनांची बेरीज $1080^\circ$ आहे तर त्या आकृतीला किती बाजु आहेत ?
(A) 9 (B) 8 (C) 6 (D) 10


187. 20 पैसे, 25 पैसे व 1 रुपया यांची प्रत्येकी 5 : 4 : 3 या प्रमाणात नाणी घेतल्यास 50 रुपयात 1 रुपयांची किती नाणी असतील ?
(A) 30 (B) 40 (C) 20 (D) 10

188. खालील आकृतीत प्रश्नचिन्हांच्या जागी काय येईल ते पर्यायातून निवडा.




(A) 105 (B) 151 (C) 70 (D) 86


189. खालील आकृतीत प्रश्नचिन्हांच्या जागी काय येईल ते पर्यायातून निवडा.




(A) 6 (B) 15 (C) 10 (D) 7


SPACE FOR ROUGH WORK

190. खालील आकृतीत प्रश्नचिन्हांच्या जागी काय येईल ते पर्यायातून निवडा.




(A) 65　(B) 37　(C) 27　(D) 47


191. खालील आकृतीत प्रश्नचिन्हांच्या जागी काय येईल ते पर्यायातून निवडा.




(A) 25　(B) 17　(C) 19　(D) 37

192. घनाची पृष्ठे चार वेगवेगळ्या स्थितीत कशी दिसतील ते दाखविले आहे. या आकृत्यांचे निरीक्षण करा व अचूक उत्तराचा पर्याय निवडा.

3 हा अंक असलेल्या पृष्ठाच्या विरुद्ध पृष्ठावर कोणता अंक येईल ?




(A) 4　(B) 6　(C) 2　(D) 1

193. माझे वडील तुझ्या बहिणीचे भाऊ आहेत. तर तुझ्या बहिणीशी माझे नाते काय ?

(A) भाचा
(B) मुलगा
(C) चुलतभाऊ
(D) पुतण्या

194. 8 वाजून 10 मिनिटांची घड्याळाच्या दोन काट्यात किती अंशाचा कोन होईल ?


(A) 175°
(B) 180°
(C) 165°
(D) 185°

195. एका रांगेत पहिल्या मुलानंतर एक मुलगी, दुसऱ्या मुलानंतर 2 मुली, तिसऱ्या मुलानंतर 3 मुली … याप्रमाणे 45 मुले उभी आहेत, तर 45 मुलांमध्ये एकूण मुली किती ?

(A) 24
(B) 36
(C) 28
(D) 8


SPACE FOR ROUGH WORK

196. आकृतीत एकूण त्रिकोण किती ?




(A) 21 (B) 15 (C) 7 (D) 24

197. आकृतीत प्रत्येकी दोन बिंदू जोडून आणखी किती रेषाखंड काढता येतील ?





(A) 15 (B) 12 (C) 9 (D) 3

198. आकृतीत एकूण किती चौकोन आहेत ?



(A) 15 (B) 5 (C) 6 (D) 10

199. सोबतच्या आकृतीत एकूण किती चौरस आहेत ?



(A) 9 (B) 5 (C) 4 (D) 8

200. सोबतच्या बेरजेच्या उदाहरणात समान अक्षरासाठी समान अंक व भिन्न अक्षरासाठी भिन्न अंक वापरले आहेत तर 'ब' आणि 'च' या अक्षरासाठी अनुक्रमे कोणते अंक वापरले आहेत ?

```
    ब  च  त
 +  ब  च  त
 +  ब  च  त
 ----------
    त  त  त
```

(A) 5, 8 (B) 1, 8 (C) 8, 1 (D) 2, 8

SPACE FOR ROUGH WORK